# फळसेवाडी हितकारी संस्था
## लक्ष्मी पूजनाची सभा

प्रिय बंधू भगिनीनो,

प्रती वर्षाप्रमाणे  याही वर्षी आपल्या संस्थेच्या 'लक्ष्मीपुजनाच कार्यक्रम" दिनांक 30 ऑक्टोबर 1997 रोजी श्री मधूकर संभाजी राणे यांचे निवास स्थानी आयोजित करण्यात आलेला आहे. तरी बंधु भगिनींना विनंती करण्यात येते की या कार्यक्रमास वेळेवर उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

आपला

सुनिल सदानंद राणे
चिटणीस

# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>

## लक्ष्मी पूजनाची सभा

**दिनांक** : गुरूवार 30 ऑक्टोबर 1997
**स्थळ** : श्री मधुकर संभाजी राणे, अभ्युदय नगर, बिल्डिंग नं. 13, काळाचौकी, मुंबई – 400 013 यांचे घर

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे | 5. श्री लक्ष्मण शिवाजी राणे |
| 2. श्री श्रीधर आत्माराम राणे | 6. श्री दिलीप मधुकर राणे |
| 3. श्री रमेश रघुनाथ राणे | 7. श्री अविनाश कृष्णाजी राणे |
| 4. श्री साबाजी त्रिंबक राणे | 8. श्री सत्यविजय शिवराम राणे |

उपरोक्त संस्थेची लक्ष्मीपूजनाची सभा श्री मधुकर संभाजी राणे यांच्या निवासस्थानी झाली. या वेळी कार्यक्रमास 8 सभासद उपस्थित होते.

सालाबादप्रमाणे लक्ष्मी पुजनाचा कार्यक्रम सायंकाळी 6:30 वाजता संस्थेचे सभासद श्री मधुकर संभाजी राणे यांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष श्री प्रताप विठोबा राणे काही कारणांमुळे अनुपस्थित असल्यामुळे, संस्थेचे माननिय सभासद श्री अविनाश कृष्णाजी राणे यांची एकमताने निवड करण्यात आली.

अध्यक्षांच्या परवानगीने वाडीतील विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. संस्थेचे चिटणीस श्री सुनिल राणे यांनी वाडीतील कामकाजाबद्दल थोडक्यात माहिती सांगितली. वाडीतील समस्या सोडवण्याबाबत वाडीतील ग्रामस्थ श्री नाना राजाराम राणे, श्री बाळा राणे, श्री सुरेश राणे व श्रीअंकुश मारुती राणे हे प्रयत्नशील आहेत त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले. तसेच या प्रसंगी संस्थेची रु.60/- प्रमाणे वर्गणी गोळा करण्यातआली ते रु.480/- रुपये होती. यानंतर रुम मालक श्री मधुकर संभाजी राणे यांच्या मार्फत चहापाण्याची व्यवस्था करण्यातआली याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे असेच सहकार्य त्यांच्याकडून अपेक्षित आहे.

यानंतर सभेचे अध्यक्ष श्री अविनाश कृष्णाजी राणे यांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

---

श्री सुनिल सदानंद राणे
चिटणीस